# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 28/04/2023 (शुक्रवार) दुपार

---

**अपहृत झालेल्या अल्पवयीन मुलीचा**
**४८ तासाचे आत घेतला शोध**
**(स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई)**

दि. २५/०४/२०२३ रोजी एमआयडीसी परीसर, पोस्टे उमरेड हद्दीतून फिर्यादीची अल्पवयीन लहान बहीण ०८ वर्षीय अपहृत अल्पवयीन मुलगी हिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेल्याबाबत तक्रार पोलीस ठाणे उमरेड येथे प्राप्त झाली. प्राप्त तक्रारीची दखल घेवून अज्ञात आरोपीविरुध्द पोस्टे उमरेड येथे अप क्र. २५१/२३ कलम ३६३ भादवि. अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास हा मा. वरीष्ठांच्या आदेशान्वये नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक तयार करुन अपहृत अल्पवयीन मुलीचा शोध घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सदर प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरु केला. सदर अपहृत मुलीचा शोध घेणेकरीता विविध पथक तयार करण्यात आले. पथकाने पोस्टे परीसरातील सिसीटीव्ही फुटेज पाहणी केली. पिडीत राहात असलेल्या एमआयडीसी, उमरेड परीसर, उमरेड शहरातील परीसर, महामार्ग व शहरातील हॉटेल, रिसॉर्ट, खानावळ, मंगल कार्यालय, महामार्ग व सिसीटीव्ही फुटेजची तपासणी अशी प्रत्येकास वेगवेगळी जबाबदारी देवुन पिडीत मुलीचा कुठलाही फोटो उपलब्ध असल्याने केवळ तिचे वर्णनाचे आधारावर अनेक लोकांना विचारपुस करून शोध घेतला. व्हॉटसअॅप व ईतर सोशल मिडीयाचे माध्यमातुनही तिचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. तपासा दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दि. २७/०४/२०२३ रोजी खात्रीशिर माहिती मिळाली की, अपहृत मुलगी ही गिरड रोड एमआयडीसी उमरेड हद्दीत सदर गुन्हयातील अल्पवयीन मुलगी एका कच्च्या रोडने एकटी फिरत असतांना दिसुन आली. सदर मुलीला स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण च्या पथकाने ताब्यात घेवुन पुढील कार्यवाहीस्तव पोस्टे उमरेड यांच्या स्वाधीन करण्यात आले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात श्री ओमप्रकाश कोकाटे पोलीस निरीक्षक, पोउपनि. आशिष मोरघडे, पोहवा अरविंद भगत, नरेंद्र पटले, पोना बालाजी साखरे, अजीज शेख स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे पथकाने पार पाडली.



## घरफोडी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील राममंदीर रोड कारोकार चौक सावनेर येथे दिनांक २७/०४/२०२३ चे ०१.०० वा. ते ०४.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे— संदीप पुरूषोत्तम ढवळे, वय ४५ वर्ष, रा. वार्ड नं १२ राममंदीर रोड कारोकार चौक सावनेर ता. सावनेर हे दिनांक २६/०४/२०२३ रोजी रात्री १०/०० वा. घराच्या वरच्या मजल्यावर झोपलेले असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे कुलुप तोडुन लोखंडी आलमारी मधुन १) १ तोळयाची सोन्याची पोत किंमती अंदाजे २५०००/—रू २) जुनी बनवलेली दीड तोळयाची चैन किंमती अंदाजे १२०००/—रू ३) सोन्याची शटकोणी आकाराची १०० मणी एकुण ०५ किंमती अंदाजे ३०००/—रू ४) दोन सोन्याची अंगठी प्रत्येकी ०६ ग्रॅम किंमती अंदाजे ६०००/—रू ५) सोन्याचा नाकातील मुखडा २ ग्रॅम किंमती अंदाजे ४०००/—रू ६) चांदीची पायपट्टी ८० ग्रॅम किंमती अंदाजे ४०००/—रू व डेली कलेक्शन आरडी मधील नगदी १६,५००/—रू असा एकुण ७०,५००/—रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ राठोड मो. नं. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर